# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १६.११.२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१४) इतिवृत्त**

बुधवार दिनांक १६ नोव्हेंबर २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १.०० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०५) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०६) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०७) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(०८) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०९) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१०) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(११) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१२) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**संवाद :**

श्री.कवरसिंग बैनाडे : माजे राष्ट्रपती स्व. के.आर. नारायणन यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : माजे केंद्रींय मंत्री स्व. प्रा. मधु दंडवते यांचेही दु:खद निधन झालेले आहे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.विनायक पांडे : यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : ठिक आहे सर्वानी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.
(स्व. माजे राष्ट्रपती के. आर. नारायनण तसेच माजे केंद्रीय मंत्री स्व.प्रा. मधु दंडवते यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.मुजेब खान : पालिकेचे सदस्य म्हणून निवडून येवून ६ महिने झाले, स्थायी समिती, सर्वसाधारण सभा वेळोवेळी होत आहे. सर्व विकास कामासाठी सूचना करीत आहे परंतू गेल्या ६ महिन्यात आतापर्यत एकाही वार्डात विकास काम झालेले नाही. बजेट मंजूर होवून चार महिने झाले. केंव्हा खर्च करणार आहे. सहा महिन्यात ९० टक्के अंदाजपत्रक तयार होतील असे प्रशासनाने मागिल बैठकीत सांगितलेले होते. वार्डात कचऱ्याचे ढिग पडून आहेत. माझ्या वार्डात एकही विकास काम सुरू

झालेले नाही. किती दिवस वाट पाहणार. कामे होणार नसतील तर तसा खुलासा प्रशासनाने करावा. जनतेला तसे आम्हाला सांगता येईल.

श्री. विनायक पांडे : गंभीर प्रश्न आहे. आपआपल्या वार्डात कामे करण्यासाठी सर्व सदस्य प्रयत्नशील होते व आहेत. परंतु वार्डात एकही असे ठोस काम झालेले दिसून येत नाही असेल तर तसे दाखवून दयावे. विकास कामे केंव्हा सुरू करण्यात येणार आहे. सविस्तर खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : स.सदस्यांनी जे प्रश्न विचारलेला आहे त्याचा संपूर्ण खुलासा सर्व कार्यकारी अभियंता यांनी करावे सन २००५-०६ च्या बजेटमधे विभाग वाईजहेड आहेत त्यातून किती कामे झालेली आहे. किती कामाचे अंदाजपत्रक तयार आहेत.किंती कामाचे बीले देण्यात आलेली आहे. किती कामे नवीन झालेली आहे. संपूर्ण खुलासा करावा सुरूवातीस अति.शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : या वर्षासाठी या विभागास १६ कोटीचे बजेट आहे. ९० टक्के अंदाजपत्रके तयार आहेत. मंजूरी होवून आता निविदा काढण्याच्या कार्यवाहीसाठी आहे. यातील अडीच ते ३ कोटीच्या निविदा वृत्तपत्रात आलेल्या आहेत. दीड कोटीच्या कामाचे सबमिशन मध्ये आहे, जे मंजूर झाले ती कामे सुरू केलेली आहे. यात रस्त्याची जस्त प्रमाणात कामे आहेत. डांबरीकरणाची कामे पावसाळा असल्यामुळे करू शकलो नाही. आता पाऊस नाही. दोन कामे सुरू केली आहे. हर्सूल तसेच बुढीलेन येथे कालपासून डांबरीकरणाचे काम सुरू केले आहे.

मा.सभापती : गेल्या सहा महिन्यात अति.शहर अभियंता विभागा अंतर्गत किती रक्कम विकास कामावर खर्च झालेली आहे .

अति.शहर अभियंता : तुर्त माझ्याकडे माहिती नाही. वेळ दिल्यास माहिती मागवून घेण्यात येईल.

मा.सभापती : अर्ध्या तासात माहिती मागवून घ्यावी. कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचे विभागासंबधीचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पा.पु.) : पाणी पुरवठा विभागासाठी बजेट मधे एकूण १४.७३ कोटीची तरतूद आहे. त्यापैकी ९.०४ कोटीची अंदाजपत्रके मंजूरीसाठी सादर केलेले असून भांडवली कामामधे जे पाईपचे कामे आहे त्यासाठी एकत्रिक पाईपची संख्या काढून ४ कोटीचे अंदाजपत्रक १९ तारखेच्या सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आले होते. मंजूरीनंतर पाईप खरेदी एकत्रितरित्या करून तोपर्यत या निविदा मंजूर होतील व कामाला सुरूवात करण्यात येईल.

मा.सभापती : सन २००५-०६ च्या बजेटमधून पाणीपूरवठा विभागा अंतर्गत विकास कामाचे किती रक्कमेचे बिल आतापर्यत अदा करण्यात आलेले आहे.

कार्य.अभियंता(पा.पु.) : नवीन कामाचे बिल अदा केलेले नाही.

कार्य. अभियंता(वि.) : या विभागा अंतर्गत सन २००५-०६ च्या बजेटमधे ड्रेनेज, विदयुत व इमारती बांधकाम तसेच उदयान भाग आहेत. यात जलनि:स्सारण यासाठी १०.२० कोटी व विदयुत साठी ५.३३ कोटी, इमारती उदयाने आणि बांधकामे यासाठी ८.१५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. एकूण बजेट जे २३.४८ कोटी आहे. सन ०५-०६ या वर्षातील कामाची संख्या ही ६१९ असून यातील फुटकळ कामे व इतर 'बी 'वन ची कामे सहीत ४२४ कामाचे अंदाजपत्रक प्रस्तावित केलेली आहेत त्यांची एकूण रक्कम ही ९ कोटी ७३ लक्ष अशी होते.त्यापैकी १४७ कामास मंजूरी मिळालेली असून त्यातील ६३ कामे ही प्रभाग समितीकडे मंजूरीसाठी

पाठविण्यात आलेली आहे. अद्याप मंजूरी अप्राप्त आहे. निविदा अंतर्गत अशी ३९ कामे आहेत.त्यातील ६ कामाच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत.

मा.सभापती : या वर्षाच्या बजेटमधील विकास कामावर या विभागाकडून बील अदा केलेले आहे. प्रत्यक्षात कामे किती चालू झालेली आहे ही मुळ मागणी स.सदस्यांची आहे.

कार्य.अभियंता(वि.) : फक्त सहा कामास सुरूवात केलेली आहे.

मा.सभापती : ६१९ कामापैकी फक्त सहा कामास सुरूवात झाली. टक्केवारी काढली तर फक्त १ टक्का येते. आता मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा की सन २००५-०६ या अर्थसंकल्पातील विकास कामावर किती रक्कम आतापर्यत अदा केलेली आहे.विभाग निहाय माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी : ३१ ऑक्टोंबर पर्यत जी अंदापत्रकीय रक्कम लेखा विभागात नोंदीत करण्यात आलेली आहे त्यामध्ये शहर अभियंता या विभागाचे ३.५७ कोटी अंदाजपत्रक नोंदीत झालेले आहे. अति. शहर अभियंता विभागाची ६.१९ कोटी ची नोंदीत झालेली आहे. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा ७.१० कोटी, कार्यकारी अभियंता विद्युत ३.२१ कोटी अशा प्रकारे २०.०८ कोटीची अंदाजपत्रक नोंदीत झालेली आहे. या चारही विभागाचा ३१ ऑक्टोबर अखेरचा जे खर्च आहे तो शहर अभियंता १.६२ कोटी, अति.शहर अभियंता १.९९ कोटी , कार्यकारी अभियंता पाणीपूरवठा ४.६५ कोटी, कार्यकारी अभियंता विदयुत २.६९ कोटी अशा प्रकारे एकूण १०.४७ कोटीची देयके अदा करण्यात आलेली आहे.

मा.सभापती : यात सन २००५-०६ च्या कामाचा समावेश आहेत का एकत्रिक सर्व कामाचा समावेश आहे.

मुख्यलेखाधिकारी : यात स्पील ओव्हर व चालू वर्षातील बिलाचा समावेश आहे.

मा.सभापती : ही महानगरपालिका 'क' वर्ग आहे. जर लाख दीड लाख व २५ हजराच्या विकास कामावरच प्रशासन समाधानी असेल तर योग्य नाही.

मुख्यलेखाधिकारी : निंविदा टेंडर प्रोसेस जूलै नंतर सूरू झालेली आहे. ५६ टेंडर नोटीस काढलेल्या असून त्यात एकूण १९२ कामे येतात. यावर ९.५३ कोटी रक्कम खर्च येतो. टेंडर काढून स्थायी समितीची मान्यता घेवून साधारणत: दीड महिणयाचा कालावधी जतो यात नवीन कामावर खर्च झालेला नाही.

मा.सभापती : सन २००५-०६ या वर्षातील ७० कोटीची विकास कामे करणार असेल तर किमान १० ते १५ कोटीची कामे पहिल्या टप्प्यात होणे आवश्यक होते. परंतु फक्त दोन कोटीचीच कामे झालेले नाही. आणखी पुढील काळात प्रशासन स्पील ओव्हरचीच कामे करीत राहणार आहात का नवीन कामे स्पील ओव्हरमध्ये करणार आहात का असे काही धोरण प्रशासनाचे आहे का? तसे असेल तर खुलासा करावा.

मा.आयुक्त : एकूण विकास कामे ही ७२ कोटीची करणे आहे. त्यातील २० कोटीची कामे ही स्पील ओव्हरची आहे. ७२ कोटी पैकी ११ कोटी आतापर्यत विकास कामावर खर्च पडलेला आहे. ६२ कोटीचा खर्च करायचा आहे. या वर्षीचे बजेट उशीरा मंजूर झालेले आहे. नवीन कामात लहान स्वरूपाची कामे झालेली असून त्यावरील खर्च हा कमी झालेला आहे. निश्चित झालेला खर्च मला सांगता येणार नाही. मोठया स्वरूपाची कामे ही पूर्ण प्रोसीजर झाल्यानंतरच त्याचा खर्च पडतो. पावसाळयानंतर

काही कामे करावी लागतात त्यानंतरच तो काही खर्च पडतो. नवीन कामावर खर्च हा नोव्हेंबर अखेर होईल. ७० कोटी पैकी ४० कोटीचे कामाचे टेंडर अंदाजपत्रक वगैरे करणे प्रोसेस पूर्ण झालेली आहे. ६० टक्के टेंडर पर्यंत कार्यवाही झालेली आहे. यावरील खर्च पडण्यास जनेवारी फेब्रुवारी महिण्यात सुरूवात होईल. जेंव्हा खर्च करतो तो उत्पन्न बघूनच करावा लागतो. आतापर्यंत जेउत्पन्न झालेले त्यात पगार व इतर खर्च व ११ कोटी हा विकास कामावर खर्च झालेला आहे. वसुलीची रक्कम जी येणार आहे ती यापुढे येईल. नोव्हेंबर डिसेंबर पर्यंत जस्त वसुली होत नाही. पाणी पट्टी मालमत्ता कर इ. १० ते १२ कोटीची वसूली आतापर्यंत झालेली आहे. मागिल वर्षाचा विचार करता ही वसुली चार पट जस्त आहे. नवीन कामाची प्रोसेस ही ऑगस्ट महिन्यानंतर सुरू झालेली आहे. बजेट मधील मोठया कामाचा खर्च अजून पडलेला नाही. फुटकळ स्वरूपाची कामे झालेली आहे. पैसे असून खर्च करीत नाही असाही भाग नाही. जे ३० कोटीचे अंदाजपत्रक झालेले नाही ते येत्या १५ ते २० दिवसात होतील. वसुलीचा सुध्दा विचार करावा लागेल.

श्री.गजनन बारवाल : सर्वांना दिपावली व ईद निमित्त शुभेच्छा देतो. मा.आयुक्तांनी जे खुलासा केला त्याबद्दल खेद वाटतो. एकीकडे आपण विकास व्यवस्थित होत आहे असे म्हणतो. योग्य विषयाला आपण हात घातला. बजेटमधील कामांना आता यापुढे सुरूवात झालेली दिसून येईल. नवीन कामाची बिले अद्याप अदा केलेली नाही. कोणतीही कामे झालेलीच नाही. किरकोळ कामाची बिले अदा केलेली आहे हे प्रशासनाने मान्य केलेले आहे. ६० टक्के विकास कामाची प्रोसेस पूर्ण झालेली आहे असे म्हटले परंतू शहरात कुठेही बघीतले तर नवीन काम होत असतांना दिसून येत नाही. मंद गतीने कार्यवाही होत आहे. कामाचा प्रोग्रेस पाहिजे तसा नाही. गेल्या तीन महिण्यात कोणतेही टेंडर मान्यतेसाठी या सभागृहात आलेले नाही व प्रत्यक्षात कामाला सुरूवात झालेली नाही. जकात वसुली नेहमीपेक्षा चांगली असून सुध्दा पैसे नाही असे प्रशासन मत मांडते. प्रशासनाचे म्हणणे काय आहे खुलासा घ्यावा.

मा.आयुक्त : ४० कोटीचे अंदाजपत्रक होवून प्रोसेस पूर्ण झालेली आहे. ६० टक्के कार्यवाही पूर्ण झाली आहे, कामावर तेवढा खर्च झालेला नाही. पाणीपट्टी व मालमत्ता कर जवळपास १० ते १२ कोटीपर्यंत वसुली झालेली आहे. आतापर्यंत ६० ते ६५ कोटी उत्पन्न मिळाले ते खर्च पण झालेले आहे. त्यापैकी १० ते ११ कोटी हे विकास कामावर खर्च झालेले आहे.

श्री.गजनन बारवाल : जेबिल दिले ते स्पील ओव्हरचे दिले ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. नवीन बजेटमधील कोणतीही कामे झालेली नाही. असे सभागृहाचे स्पष्ट मत आहे.

मा.आयुक्त : नवीन कामाचा खर्च इतक्या लवकर पडणे शक्य नाही. स्पील ओव्हरची २० कोटीची कामे होती. त्यातील काही कामावर खर्च झालेला आहे. स्पील ओव्हरसहीत विकास कामावर १० ते ११ कोटी खर्च झालेले आहे. यात ९० टक्के ही स्पील ओव्हरची कामे झालेली आहे.

श्री.गजनन बारवाल : जे खर्च झाला तो स्पील ओव्हरच्या कामावर झालेला आहे. नवीन कामास यानंतर सुरूवात होणार आहे. भविष्यात सर्व नवीन विकास कामे होणार की नाही शंका येते.

मा.आयुक्त : सीक्वेन्स नुसार बिल अदा होईल. स्पील ओव्हरची बिले अगोदर द्यावी लागणार आहेत.

श्री.गजनन बारवाल : नवीन कामास गती देण्यास प्रशासन कमी पडलेले आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

मा.आयुक्त : मोठया कामाचा खर्च हा डिसेंबर नंतरच पडेल. प्रोसीजर व सीक्वेन्स नुसार खर्च पडणार असून आणखी १० कोटीची कामे ही स्पील ओव्हरची आहेत. जे उत्पन्न आले ते आतापर्यंत खर्चही झालेले आहे.

श्री.विनायक पांडे : आताच खुलासा झाला स्पिल ओव्हरची कामे करण्यात आलेली आहे. आम्ही सदस्य लाईटच्या संदर्भात तक्रारी घेवून जतो तेंव्हा असे सांगण्यात येते की, सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पातील बजेट संपलेले आहे. यापुढील सहा महिण्यात लाइटची कामे होणार आहे की नाही याचा खुलासा करावा.

श्री. मुजीब खान : विकास कामासंदर्भात नगरसेवक व जनतेला जे विश्वास होता तो गमावण्याचा नवीन प्रकार प्रशासनाच्या वतीने समोर आलेला आहे पुढील सहा महिण्यातही विकास कामे होणार नाही असे चित्र समोर दिसते. १० ते ११ कोटी विकास कामावर खर्च झाले त्यात काही किरकोळ स्वरूपाची नवीन कामे करण्यात आली. ही सर्व कामे कोणत्या वार्डात व कोणत्या भागात करण्यात आली याचा स्पष्ट खुलासा होणे अपेक्षीत आहे. माझ्या वार्डात १ लक्ष चे सुध्दा काम करण्यात आलेले नाही.

मा.आयुक्त : संबधीत अधिकारी या कामा संबधीची यादी आपणास देतील.

श्री.शंशाक विसपुते : या वर्षीच्या अर्थसंकल्पात अनेक कामासाठी बजेट तरतूद करण्यात आलेली आहे. ज्या वसाहती २५ वर्षापासून आहेत तेथे मुलभूत सुविधा दिलेल्या नाही अधिकाऱ्यांना काही भागात प्रत्यक्ष घेवून गेलो होतो. जय दुर्गा हौसींग सोसायटीमध्ये पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी येते, सर्व परीस्थिती दाखवून दिल्यानंतरही त्याची दखल घेण्यात आलेली नाही. त्या भागात आपण सुध्दा पाहणी केलेली आहे. तसेच लाईट लावण्याबाबत विचारणा केली तर बजेट नाही असे सांगण्यात येते. वार्डात एक महिण्यापासून लाईट चालू नाही.

मा.सभापती : स.सदस्य श्री. विसपुते तसेच श्री. विनायक पांडे यांनी जी सुचना लाईटच्या संदर्भात मांडली त्या संबधी कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी खुलासा करावा.

कार्य. अभियंता(वि.) : जय दुर्गा हौसींग सोसायटीच्या संदर्भात रूपये ४.५७ लाखाचे अंदाजपत्रक तयार केलेले असून मंजूरीसाठी सादर करण्यात आलेले आहे. लाईटसाठी एक कोटीची तरतूद अर्थसंकल्पात होती. मी जेंव्हा चार्ज घेतला तेंव्हा बजेट नुसार लाईटची बरीच कामे करण्यात आलेली होती टेंडर नोटीस, वर्क ऑर्डर झालेल्या होत्या. या विभागातील दोन्ही उप अभियंत्यांशी चर्चा केली असता असे सांगितले की आचारसंहितेच्या काळातच अनेक कामे करण्यात आलेली असून वर्क ऑर्डर देता येत नव्हत्या त्या आता दिल्या. प्रत्यक्षात कामे यापूर्वीच झाली, बुकींग आता दिसत असले तरी कामे यापूर्वीच करून घेतली असे निदर्शनास आलेले आहे. नवीन जी कामे घेतली, मंत्रीमंडळाच्या बैठकी निमित्ताने तसेच गणपती उत्सव या निमित्ताने जी कामे केली यासाठी सुध्दा निधी नाही. लेखा विभागाकडून नुकतेच पत्र आलेले आहे की लाईटसाठी बजेट उपलब्ध नाही. कोणतेही अंदाजपत्रक मंजूरीसाठी सादर करू नये.

मा.आयुक्त : बजेट मध्ये ज्या कामासाठी तरतूद ठेवलेली आहे ती खर्च करणे हे प्रशासनाचे काम आहे. बजेटमध्ये असेल तर ते काम झालेच पाहिजे. असे कोणते काम आहे की बजेटमध्ये असून सुध्दा झालेले नाही. कॅश जशी येईल तसे बिल अदा केले जईल. कराची वसुली ही सर्वात जस्त मार्च महिण्यात येत असते. १०० टक्के वसूली करणे व १००टक्के खर्च करणे गरजेचे आहे. बजेटमध्ये जे काम आहे ते सर्व होतील परंतू ज्या सिक्वेन्सनुसार बिल येतील त्यानुसार अदा होतील.

मा.सभापती : देखभाल दुरूस्तीचे कामाचे बजेट संपलेले आहे का, स्पष्ट खुलासा करावा.

कार्य. अभियंता(वि.) : लाईटचे ७० लक्षचे साहित्य खरेदी करायचे होते ते अद्याप केलेले नाही. त्यामुळे लाईट लावण्यास अडचण येत आहे. एक दोन बल्ब लावल्यास एक रेटलिस्ट होते. एक तर साहित्य खरेदी करावयास पाहिजे होते किंवा देखभाल दुरूस्तीमध्ये सदर रक्कम वळती करावयास पाहिजे, तरच पुढील सहा महिण्यात देखभाल दुरूस्तीची कामे करता येतील. बी.ओ.टी.चा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.आयुक्त : जेवढा खर्च हेडवाईज होता तेवढा खर्च झाला. आणखी आवश्यकता असेल तर सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून ती रक्कम देखभाल दुरूस्तीच्या कामात वळती करावी लागेल. वाढवून घ्यावयाचे असेल तर जमेची बाजू वाढवून दाखवावी लागणार आहे. तसेच या संदर्भात बी.ओ.टी. पध्दतीने कार्यवाही प्रोसेसमधे आहे. जे सेव्हिंग आहे त्यातून पथदिवे लावण्यास तयार आहे.

श्री.साहेबराव कावडे : लाईटसाठी जे बजेट या वर्षाच्या अर्थसंकल्पात होते ते कोणत्या वार्डात खर्च करण्यात आलेले आहे. माझ्या वार्डात या वर्षात ८० ते ८५ बल्ब लावण्यात आले

मा.आयुक्त : कोणत्या वार्डात खर्च झालेले आहे याची यादीसह आपणांस संबधीत अधिकारी माहिती देतील.

मा.सभापती : स.सदस्यांनी तसे पत्र द्यावे लेखी स्वरूपात त्यांना माहिती मिळेल.

श्री.रेणुकादास वैद्य : आताच खुलासा झाला १०० टक्के बजेट ज्या कामासाठी ठेवले ते खर्च करण्यात येईल. संत एकनाथ रंगमंदीर साठी २५ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली असतांना आजपर्यंत एक लक्षचे काम सुध्दा चालू केलेले नाही. खाजगी नाटयगृह चांगले चालावे यासाठी अशी मंद गतीने कार्यवाही होते काय असा संशय येतो.

शहर अभियंता : या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

श्री.गजनन बारवाल : २५ लक्षची तरतूद असतांना सुध्दा आतापर्यंत एक लक्षचे काम सुरू झाले नाही .

कार्य. अभियंता(वि.) : या तरतूदीपैकी १७ लक्षचे अंदाजपत्रक तयार केले आजच सादर करण्यात येईल.

श्री.मुजीब खान : जी १० ते ११ कोटीची त्यात किरकोळ स्वरूपाचीही विकास कामे करण्यात आली ती कोणत्या वार्डात व कोणत्या भागात करण्यात आली व बिले कोणास अदा करण्यात आली संपूर्ण खुलासा करावा.

मा. आयुक्त : मुख्य लेखाधिकारी यांना सूचना देण्यात येत आहे, १००% कामांवर झालेल्या खर्चाची माहिती इंटरनेटवर टाकावी.

मा.सभापती : कोणत्या वार्डात विकास कामे करण्यात आलेली आहे त्या त्या प्रभागाच्या स.सदस्यांना तशी माहिती देण्यात यावी. जी उर्वरीत बजेट तरतूदीनुसार ६०

कोटीची कामे अजून करायची बाकी आहे त्यात कोणतीही कपात करण्यात येवू नये. ज्या विभागा अंतर्गत जे हेडवाईज बजेट विकास कामासाठी ठेवलेले आहे ते पूर्ण खर्च करण्याची कार्यवाही करावी. नसता संबधीत अधिकाऱ्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, अशा सुचना करण्यात येतात. तसेच विद्युत साहित्य खरेदीसाठी ७० लक्षची तरतूद आहे त्यापैकी ५० लक्ष रक्कम देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी वळती करण्यात यावी. त्यास मान्यता देण्यात येते. तसा प्रस्ताव मा.महापौर यांचेकडे सर्वसाधारण सभेसाठी प्रशासनाने दयावा. तसेच सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेने गुंठेवारी भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासंदर्भात निर्णय घेतलेला आहे. तसेच मा.आयुक्त यांनी वारंवार तशा सुचना सर्व संबधीत कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या आहेत त्यानुसार गुंठेवारी भागात देखभाल दुरूस्तीची ड्रेनेज, लाईट तसेच पाणी पुरवठयाची कामे करण्यात यावी. तशा सुचना प्रशासनास देण्यात येतात. मा.आयुक्त यांनी तशा सुचना या सभागृहात संबधीत अधिकाऱ्यांना द्याव्यात.

मा.आयुक्त : सुभेदारी गेस्ट हाऊस समोरील रस्ता बीओटी बेसीस वर केले त्याचे कारण असे की आपणा सर्वांना माहिती झाली पाहिजेकी त्याचा फायदा काय होणार आहे. पूर्ण रस्ता हा बीओटी पध्दतीने सेव्हींगवर टक्केवारी नुसार केलेला आहे. दोन ते तीन महानगरपालिकेमध्ये तसे रस्ते करण्यात येत आहे. कोल्हापूर महानगरपालिकेत बीओटी पध्दतीने होत आहे. ज्या गुंठेवारीचा सर्वे सुरू केला अधिकृत होण्यासारख्या ज्या वसाहती आहेत, त्यात देखभाल दुरूस्तीची कामे शासन निर्देशानुसार करावे. नगरसेवकांचा निधी हा देखभाल दुरूस्तीसाठी नाही नवीन कामासाठी वापरता येईल परंतु गुंठेवारीत तसे काम करता येणार नाही.

श्री.मुजेब खान : गुंठेवारीचा सर्वे जी एजन्सी करीत आहे ते कर्मचारी हे टेक्नीकल नाहीत. ज्यांना मोजमाप करता येत नाही, ज्यांना टेक्नीकल माहिती नाही, असे लोक सर्वेचे काम करीत आहेत. हे योग्य नाही.

मा.आयुक्त : टेक्नीकल नसतील तर त्या एजन्सीच्या संदर्भात चौकशी केली जईल.

मा.सभापती : सर्वेसाठी ज्या एजन्सी नियुक्त केल्या आहेत. त्या एक एजन्सीच्या कार्यक्षेत्रात जे जे वार्ड येतात अशा वार्डातील प्रत्येक एजन्सीच्या क्षेत्रातील त्या त्या वार्डातील नगरसेवकांची सहा.संचालक यांनी त्यांचे दालनात बैठक आयोजित करावी व त्या त्या भागातील स.सदस्य सुचवतील त्या प्रमाणे सर्वेचे काम करावे. यात दिरंगाई होवू नये. स.सदस्यांनी सुध्दा पॉझीटिव्ह मत देवून ज्या सूचना असतील त्या सुचनाचे निराकरण करून घ्यावे. या सर्वेसाठी स.सदस्यांनी मदत करावी. सर्वेचे काम लवकरात लवकर कसे होईल यासाठी कार्यवाही करावी.

श्री.मुजेब खान : गारखेडा येथील भुखंडा संदर्भात चर्चा झाली. चौकशी समिती नियुक्त केली. संबधीतावर पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले त्यास २० ते २५ दिवस होत आहे त्यानंतर पुढे काय कार्यवाही झालेली आहे. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : या संदर्भात स्थायी समितीमध्ये सविस्तर चर्चा होवून समिती गठीत केलेली आहे. मुख्य लेखा परीक्षक त्याची चौकशी करीत आहेत. समितीचा अहवाल या सभागृहास प्राप्त होईल त्यावेळी सविस्तर चर्चा करून निर्णय होईल. ज्या मुदतीत चौकशी होणे अपेक्षीत आहे त्याच मुदतीत करण्यात यावी. वेळेच्या आत अहवाल या सभागृहात ठेवावा, अशा सुचना प्रशासनास देण्यात येत आहे.

श्री.मुजीब खान : तीन बैठकीपासून मोतीवाल हॉलच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करीत आहे. पत्र ही दिलेले आहे. त्या संबधी काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मा.सभापती : या संदर्भात दोन दिवसात स.सदस्यांना लेखी स्वरूपात संपूर्ण माहिती देण्यात यावी.

श्री.मिलींद दाभाडे : सुंदर कन्स्ट्रक्शनचे मालक यांनी विकास कामे न करता बिले उचलली व महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे. या संदर्भात मी एक ते दीड महिण्यापासून वांरवार प्रश्न उपस्थित करीत असून अद्याप कोणतीही कार्यवाही संबधीतावर केलेली नाही. प्रशासन का त्यांना पाठीशी घालत आहे.

मा.आयुक्त : संबधीत ठेकेदारावर स्वतंत्ररित्या कार्यवाही होईलच. परंतु सदर संचिका चालू असून त्यात काही कर्मचारी यांची वेतनवाढ थांबविण्याची कार्यवाही चालू आहे.

मा.सभापती :स.सदस्य श्री. मिलींद दाभाडे यांनी केलेल्या सुचनेनुसार संबधीतावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सौ.संगिता जधव : पुंडलिकनगर भागात घंटा गाड्याद्वारे कचरा उचलण्याचे काम चालू करण्यात आलेले होते. त्या बंद करण्यात आल्या असून आता केंव्हा चालू करण्यात येतील?

श्री.नासेर नहदी : तीन महिण्यापासून मी निर्मल असोसिएटस्च्या बाबतीत सभागृहात मुद्दा उपस्थित करीत आहे. प्रशासनास वारंवार पत्र दिलेले होते. परंतु कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे मी स्वत: या संदर्भात न्यायालयात धाव घेतली व स्थगिती आदेश मिळविले. त्याची प्रत प्रशासनास देवून सुध्दा कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रशासन कार्यवाही करणार की नाही याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.गजनन बारवाल : स.सदस्य श्री. नासेर नहदी यांनी या संदर्भात अनेक वेळा सुचना करूनही व निवेदने देवून ही कार्यवाही होत नसेल व त्यासाठी एक स.सदस्य यांना न्यायालयात धाव घ्यावी लागत असेल तर योग्य नाही. आम्ही या सभागृहात बसण्यास तयार नाही, आपली भुमिका स्पष्ट करावी.

श्री.मुजीब खान : महानगरपालिकेची जबाबदारी असतांना व स.सदस्य यांनी वारवांर मागणी केली असतांना प्रशासनाकडून कार्यवाही होत नाही. स.सदस्यांना न्यायालयात दाद मागवावी लागते हे योग्य नाही. हा सभागृहाचा अपमान आहे.

मा.सभापती : निर्मल असोसिएटस्च्या बाबतीत न्यायालयाचे स्थगिती आदेश मिळालेले आहे त्याची प्रत प्रशासनाकडे देण्यात आलेली असून मा.आयुक्त यांनी जतीने लक्ष घालून होत असलेले काम थांबविण्याची त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.गजनन बारवाल : ८ ते १० दिवसापूर्वीच शहरात डेंग्यूसारखा आजर व डासांचे प्रमाण वाढल्याचे वृत्तपत्रात आलेले आहे. त्या संबधी तक्रारी सुध्दा प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. यासाठी कर्मचारी वर्ग कमी असल्याची कबुली प्रशासनाने दिलेली आहे. पदमपुरा भागास लागून छावणीची हद्द येते त्यास लागून मोठा नाला वाहतो. नाल्याचे पाणी मोठया प्रमाणात साचलेले दिसून येते. वारंवार सुचना देवूनही कार्यवाही होत नाही, होणे शक्यही नाही. या बाबत ठोस पावले उचलावी या भागात डेंग्यूचा आजर पसरण्याची शक्यता आहे. त्वरीत तेथील काम हाती घेण्यात यावे.

श्री.मुजीब खान : सिडको भागाकडून जे नाले येतात त्या नाल्यात ज्या ड्रेनेज लाईन टाकलेल्या आहेत त्या शहरातील नाल्याच्या हद्दीपर्यंत आणून सोडलेल्या आहेत. तेथे घाण पाणी साचलेले दिसून येते व मोठया प्रमाणात दुर्गंधी येते. या संदर्भात नागरीकांनी प्रशासनाकडे तक्रारीही दिलेल्या आहेत. साचलेली घाण साफसफाई करून तेथे औषध फवारणी करावी. ही कार्यवाही होवू शकते का किंवा त्यापुढे ड्रेनेज लाईन टाकून शहराच्या बाहेर ते घाण पाणी काढण्यात यावे. यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते.

मा.सभापती : कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांनी या संदर्भात खुलासा करावा.

श्री.गजनन बारवाल : माझ्या माहिती प्रमाणे मागिल काही दिवसापूर्वी नाल्यामध्ये मुख्य ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेल्या होत्या. त्या लाईनची आजची परीस्थिती काय आहे. त्या पूर्ण करता येतील का किंवा वेगळी काही उपाययोजना करता येईल का?

मा.आयुक्त : सिडको भागाकडून अशा ड्रेनेजलाईन आलेल्या असतील व त्या महापालिकेच्या नाल्यापर्यंत आणून सोडलेल्या असतील तर त्याचे अंदाजपत्रक तयार करून त्याचा खर्च सिडको कडून वसूल केला जईल.

श्री. मुजीब खान : सिडकोने शहराच्या हद्दीपर्यंत काही ड्रेनेज लाईन आणून सोडलेल्या आहेत. तेथून पुढे घाण पाणी वाहते. मोठया प्रमाणात दुर्गंधी येते. नागरीकांना त्रास होतो. त्यासाठी काही उपाययोजना करता येईल का.

मा.सभापती : सिडकोच्या भागाकडून काही ड्रेनेज लाईन महानगरपालिकेच्या हद्दीतील नाल्यापर्यंत येतात त्या कोणकोणत्या नाल्यात सोडलेल्या आहेत. त्यासंबंधीचा अहवाल ड्रेनेज विभागाचे उप अभियंत्यामार्फत टेक्नीकल बाबी तपासून काय उपाययोजना करता येतील त्याचा संपूर्ण अहवाल कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांनी ८ दिवसात या सभागृहात ठेवावा. तसेच साफसफाईच्या बाबतीत संबधीत अधिकारी यांना सुचना देण्यात येत आहे की अनेक निविदा मा.आयुक्तांच्या अधिकारात काढण्यात आलेल्या आहेत. घंटा गाडी बाबतही निविदा काढून वार्डात घंटा गाडया लवकरात लवकर उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करावी.

श्री.नासेर नहदी : खाम नदीच्या बाजूच्या भागात अनेक अनधिकृत प्लाटींग पाडून विक्री होत आहे. पावसाळा संपला पुढील कार्यवाही संपली असे वाटते. जे लोक प्लॉटींग करीत आहे त्यांचेवर कार्यवाही करणार आहे की नाही, याचा खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : नाला सफाईसाठी ७० लक्षची तरतूद बजेट मधे आहे ती रक्कम नाला विकसीत करण्यासाठी वापरता येईल. तशी सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल. तसे प्रपोजल प्रशासनाचे आहे.

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी यांना सुचना करण्यात येत आहे की, कुठल्याही नाल्याच्या बाजूला अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच या विभागासाठी आणखी ४ इमारत निरीक्षक उपलब्ध करून देण्याबाबत उपआयुक्त प्रशासन यांनी कार्यवाही करावी. विषय पत्रिकेस सुरूवात करावी.

**विषय क्र. १०६ :**

दिनांक **१८-१०-२००५** (का.प.क्र.१२) व दि.**२५-१०-२००५** (का.प.क्र.१३) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक १८-१०-२००५ व दि.२५-१०-२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १०७ :**

जकात हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. सद्य:स्थितीत शहरात आयात होणाऱ्या मालावरील जकात कराची वसुली मनपा अस्थापनेवर कार्यरत विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून करण्यात येते. तथापी मनपाने ठरविलेल्या उद्दीष्टापेक्षा जस्त रक्कम मनपास जकात खाजगीकरणाच्या माध्यमातून प्राप्त होवू शकते. यापुर्वी सन २०००, २००१, २००२ व २००३ या वर्षामध्ये जकात खाजगीकरणासंदर्भाने निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तथापी एकानेक कारणांमुळे जकात खाजगीकरण होवू शकले नाही.

दिनांक २५/१०/२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत चर्चा होवून जकात खाजगीकरणाबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. सन २००५-२००६ साठी मनपाने जकात वसुलीचे उद्दीष्ट रूपये ८३ कोटी एवढे निश्चित केलेले असून खाजगी अभिकर्ता नेमून जकात वसुली केल्यास स्पर्धात्मक दर प्राप्त होवून उद्दीष्टापेक्षा जस्त रक्कम मनपास प्राप्त होवू शकते. या संदर्भाने खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) औद्योगिक वसाहतींना चालना मिळण्यासाठी औद्योगिक कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचे दर कमी केल्याने सदरील कारखाने शहराबाहेर शक्यतो जणार नाहीत आणि शहराबाहेर स्थलांतरीत उद्योग पुन्हा नव्याने शहरात स्थलांतरीत होतील अशी अपेक्षा आहे.

२) शहरातील व्यापार मनपा हद्दीबाहेर स्थलांतरीत होवू नये या करीता विद्युत, विद्युत साहित्य, शेती विषयक अवजरे, मुद्रण यंत्रे, मशनरी, मशनरी पार्ट, संगणक, संगणक साहित्य, बी-बियाणे, किटकनाशके, जंतु नाशके, कपडा, कोळसा इत्यादी वस्तुंचे दर कमी करण्यात आलेले आहे.

३) सोलार उद्योजकांना चालना मिळण्यासाठी सोलार वॉटर हिटर व त्यासंबंधीचे सुटे भाग या वस्तुंना जकात करातुन सूटदेण्यात आलेली आहे.

४) शालेय पुस्तके, महाविद्यालयीन शैक्षणिक पुस्तके व कायद्याची पुस्तके यांना सुध्दा शासन निर्णयानुसार जकात करातून सुट देण्यात आली आहे.

५) जकात वसुलीच्या खाजगीकरणाचे उद्दीष्ट ९९.२७ कोटी रूपये एवढे राहील.

जकातीचे खाजगीकरण करण्यापुर्वी जकात दराचे सुसूत्रीकरण करणे आवश्यक असून **Retionalization** केल्यास जकात वसुलीत काही प्रमाणात घट निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी या प्रक्रियेमुळे नजीकच्या काळात शहराच्या हद्दीबाहेर असलेले विविध व्यावसायीक गोडाऊन्स शहरात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी जकात कर उत्पन्नात भरीव वाढ झालेली असेल. तसेच **Retionalization** मुळे जकात चोरीची शक्यता पण कमी होईल अशी अपेक्षा आहे. जकात दरात सुधारणा करत असतांना सोबत संलग्न करण्यात आलेल्या **Octroi Schedule "O"{Revised}** बाबतचा तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे कायदेशीर कार्यवाही पूर्ण करून जकात कराची वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत करणे करीता निविदा प्रसिध्द करणे योग्य होईल. करीता जकात दराचे **Retionalization** करणे व खाजगी अभिकर्त्या मार्फत जकात कराची वसुली करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. रेणूकादास वैद्य : सध्या जी जकात आकारणी होते त्याप्रमाणेच आकारावी. जकातीचे खाजगीकरण करण्यात यावे.

श्री.मुजेब खान : मागिल बैठकीत खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला तसा ठराव या सभागृहाने पास केला त्यामुळे हा प्रस्ताव सादर झाला अशी शंका येते. ०.७५ टक्के जकात

दर केमिकल्स वरील कमी करण्यात आले. यामुळे वर्षभरात किती जकात कमी येणार आहे याचा खुलासा प्रशासनाकडे आहे काय? माझ्या माहिती प्रमाणे १९ ते २० कोटी कमी जकात येईल व त्याचा परिणाम बजेटवर होईल. खाजगीकरणाची कार्यवाही यशस्वी होवू नये यासाठी हे दर कमी करीत आहात असे वाटते.

मा.सभापती : प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव आलेला आहे . प्रशासनाने यावर मत मांडावे.

मा.उपआयुक्त(म) : जकात हा महानगरपालिकेचा उत्पन्नाचा प्रमूख स्त्रोत आहे. जेदर सध्या आकारले जतात त्यातील अनेक दर हे १९८४ ला निश्चित केलेले आहे. त्यामुळे २० - २१ वर्षात त्या वस्तूवरील जकात दरात बदल झालेला नव्हता. सर्व जकात दराचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात आले की काही वस्तूंवर आवश्यकते पेक्षा जस्त जकात घेतो व त्यातून जस्त जकात मिळते असे निदर्शनास आले. जकात दराचे सुसूत्रीकरण करण्याच्या दृष्टीने काही बाबी समोर ठेवल्या होत्या. अन्न धान्यावर जे दर आहे तो सरसकट अर्धा टक्के करण्यात यावा, इमारत मटेरीयलवर सरसकट ३ टक्के ठेवण्यात यावा. उद्योजकाच्या माध्यमातून आजही महानगरपालिकेस ५० टक्के जकात मिळते त्यामुळे या उद्योगांना चालना मिळावी व उद्योग टिकून रहावे किंबहुना या वसाहतीत जस्त उद्योजकांनी यावे म्हणून उद्योगांना जे कच्चा माल लागतो व उद्योगावरील जे माल आहे त्याचा दर २ टक्के ठेवण्यात यावा. दारू वगळता लग्झरी अॅटमवर ४ टक्के दर असावा. अनेक वस्तुच्या जकात दराच्या बाबतीत परीस्थिती अशी होती की, ट्रान्झीस पास हा ५० रूपयाचा व जकात ही १० रूपये येत असे, त्यासाठी ट्राझींस पास फीस पेक्षा जकात ही जस्त असावी. पेट्रोल, डिझेल वर जकात दर हा इतर महानगरपालिकेत ३ ते ४ टक्के आहे. या महानगरपालिकेत १ टक्के घेत आहे. जमेच्या बाजूभरून काढण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना केलेल्या आहेत. पेट्रोल, डिझेल वरील जकात दर वाढवल्यास जस्त उत्पन्न मिळणार आहे. सन २००५-०६ चे जकातीचे उद्दीष्ट ८३ कोटीचे आहे. जकातीचे सुसुत्रिकरण केल्यास ५.६४ कोटी कमी मिळणार होते ही रक्कम कमी केल्यास ७७.३३ कोटी रहाते. १ एप्रिल २००५ ते ३१ ऑक्टोंबर २००५ पर्यत जकात विभागाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की नैसर्गीक वाढ ही १४.४४ टक्के एवढी आहे जकात खाजगीकरण केल्यास १० टक्के नैसर्गीक वाढ व अस्थापना खर्च हा २ टक्के या सर्वांची बेरीज केल्यानंतर प्रशासनाने ९९.२७ कोटी एवढे जकातीच्या खाजगीकरणाचे उद्दीष्ट ठेवले आहे जकातीचे सुसुत्रीकरण करून होणारी तूट इतर मार्गाने भरून काढणे, उद्योग टिकून रहावे आताच म्हटले केमीकल्स वर जकात दर कमी केले. प्रत्यक्षात जकात कमी दिसते परंतू जस्त दर ठेवल्यास उद्योग बाहेर जवू शकतात व मोठया प्रमाणात तोटा होवू शकतो. त्यामुळे प्रशासनाने जकात सुसुत्रीकरण व खाजगीकरण असा सविस्तर प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवला आहे.

श्री. रेणुकादास वैद्य : अन्न धान्यावर जकात वजनावर की किमतीवर आकारणार आहात? यापुर्वी कशा प्रकारे आकारली जत असे.

मा.उपआयुक्त(श) २० ते २१ वर्षापासून अनेक वस्तूंवर जकात दर वाढविण्याचा विचार केलेला नव्हता, त्यात अन्न धान्य येते. आतापर्यत दर क्विंटल मागे १ /-रू. जकात आकारली जत असे. सुसुत्रीकरण करत असतांना ही जकात किमतीवर आकारण्याचे प्रशासनाचे धोरण आहे.

मा.आयुक्त : अन्न धान्यावर जकात मिळत नाही असा भाग नाही जकात मिळते. परंतु यातच तांदूळ या मालावर एक टक्के जकात वसूल केली जत आहे. इतर धान्यावर क्विटंलमागे १ रूपया घेतला जत आहे. त्या तुलनेत तांदुळावर जकात ही जस्त आकारली जते. जे जस्त किमतीचे धान्य घेईल त्यात क्विंटल मागे १ रूपया व कमी किमतीचे खाणारे यांना सुध्दा एकच रूपया आकारला जत असे. वजनावर जकात न आकारता ती किमतीवर आकारली पाहिजे, असे माझे मत आहे. तांदुळावर १ टक्का व इतर धान्यावर क्विटंलवर १/-रूपया असे आकारणी का होत होती हे कळायला मार्ग नाही. जकात शेडयूल 'ओ' मध्ये पहिल्या पानावर जे दिले ते सर्व जेवणासाठीचेच आहे. जकातीचे खाजगीकरण व्हावे ही प्रशासनाची सुध्दा धारणा आहे. त्यामुळे वसूली वाढेल .

श्री.रेणुकादास वैद्य : अन्न धान्यावर दरवाढ करता यास सुसुत्रता म्हणणे योग्य होणार नाही. प्लायवूड हिरे, मोती यावर जकात दर कमी करण्यात येते हे योग्य नाही. मध्यबिंदू समोर ठेवून महानगरपालिकेचे कामकाजचालावे अशी भावना सभागृहाची आहे.

श्री.गजनन बारवाल : इमारत मटेरीयलवर जकात दर वाढवू नये. सर्वांना निवासाची आवश्यकता आहे.

मा.आयुक्त : जकातीचे सुसुत्रीकरण म्हणजे त्यात तर्क असावयास पाहिजे किमतीवर जकात असावी वजनावर नाही. वजनाची, संख्या प्रत्येक वर्षी वाढते कमी ही होवू शकते. दरवाढीत १० ते १२ वर्षात बदल केले नाही तर फारच कमी जकात येते. भाजी पाला किंवा जेवणाचे जेपदार्थ आहे त्यात जकात मिळते ती जस्त नसते. यात जकात वाढत असेल तर तांदूळ खाणारे तेच व्यक्ती असते त्यात कमी करावे. तांदुळ मध्ये १.५० कोटीचे नुकसान आहे. जेवणाच्या पदार्थमध्ये जकात वाढायची नव्हती ना तोटा ना नफा करायचा होता. अन्न यांवर ०.५ टक्के जे की जेवणावर, औद्योगिक मटेरियलवर २ टक्के, इमारत मटेरीयलवर ३ टक्के, लग्झरीयस अॅटमवर ४ टक्के, इमारत मटेरीयलवर ३ टक्के आहे. प्लाऊड व इतर वस्तू होत्या ३ टक्के वर आणले ते कमी झाले. २.७ टक्के, २.५ टक्के होते ते वाढले आपण बघीतले तर इमारत मटेरीयलवर ३ टक्के आहे. कंपनीचे रॉ मटेरीयल होते त्यात बदल सुचविलेला नाही जे २ टक्के पेक्षा जस्त होते ते कमी झाले, जे २ टक्के पेक्षा कमी होते ते जस्त झाले दर वाढ करतांना दुप्पटीपेक्षा जस्त होवू नये. संगणकावर ४ टक्के आहे इतर महानगरपालिकेत १,२ टक्के पेक्षा जस्त नाही. त्यात २ टक्के सुचवले यामधील लॉटरी व प्लेगेम मशीन घेणारे वेगळे आहे, त्यावर ४ टक्के ठेवले. संगणकाचे सर्व गोडाऊन शहराच्या बाहेर आहे. २ टक्के केले म्हणून ते शहरात येतील अशी माझी खात्री आहे. बीडी, गुटका यावर १ टक्का होते ३.५ टक्के केले, लॉटरीवर ४ टक्के होते तेच ठेवले आहे यात काही फारसे पैसे मिळणार नाही. विटा, दगड या संदर्भात शहराबाहेर गाडी जणार असेल तर ५० रूपयाचा ट्रांझींस्ट पास भरण्याऐवजी १० रूपये जकात देवून जत असे. ट्रांझीस्ट पास फिस पेक्षा जकात ही जस्त असणे आवश्यक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : ट्राझीस्ट पास फीस कमी करण्यात यावे

मा.आयुक्त :५० रूपयापेक्षा कमी करू शकत नाही. सभागृहानेच निश्चित केलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : इलेक्ट्रीक फिटींग्ज, कुलर या वस्तूवर कमी केले उच्च वर्गीय लोक ते वापरतात कमी करण्यात येवू नये. घासलेटवरील जकात दरात वाढ केली त्यास गरीब लोक वापर करतात. घासलेटमधे दर वाढ करण्यात येवू नये.

मा.आयुक्त : घासलेटवर एक लिटर मागे ०.३ टक्के एक कुटूंबाने ५ लिटर वापरले तर १५ पैसे येतील जस्त नाही. यास मान्यता द्यायची नसेल तर ठिक आहे. परंतु वॉशींग मशीन व ए.सी. याचे दर वाढवून देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :इमारत मटेरीयल वर ३ टक्के ठेवले कमी करण्यात यावे.

श्री.गजनन बारवाल : वाळू, डब्बर, मुरूम यावर १० रूपयावरून डायरेक्ट १०० रूपये करण्यात आले दहा पट वाढविणे योग्य नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : डिझेजपेट्रोल तसेच घासलेटचे दर वाढ करू नये.

मा.आयुक्त :१ टक्के ऐवजी २ टक्के केलेले आहे यात ४३ पैसे प्रति लिटर मागे वाढणार, इतर महानगरपालिकेत जस्त आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : डिझेल, पेट्रोलचे, घासलेटचे दर वाढवू नये. प्लायवुड व इतर वस्तुवर वाढवावे सर्व सामान्य जनतेला दररोजज्या वस्तु लागतात त्यात वाढ करण्यात येवू नये.

श्री.बैनाडे कवरसिंग : पेट्रोल, डिझेल, घासलेट वर दरवाढ केल्यास या सभागृहाचा नागरीक निषेध केल्या शिवाय राहणार नाही. यापूर्वी हे दर होते तेच ठेवावे. हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : पूर्वीचे जेदर होते तेच ठेवावे या प्रस्तावास मान्यता दयावी.

मा.आयुक्त : दर वाढ केली नाही तर ५ ते ६ कोटीचे नुकसान होईल.

श्री.बारवाल गजनन : खाजगीकरण केले तर जस्त रक्कम मिळेल हे तर सर्वांना मान्य आहे महानगरपालिका टारगेट का पूर्ण करू शकत नाही.

मा.आयुक्त : प्रशासनाचे ठाम मत आहे की एकदा खाजगीकरण झाले तर दरवाढ करता येणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : खाजगीकरणास आमचा विरोध नाही सामान्य नागरीकावर बोज टाकण्यास आमचा विरोध आहे.

श्री.मुजीब खॉन : पूर्वी ज्या दराचे जकात आकारणी होत असे व आता नवीन दरानुसार आकारणी केल्यास महानगरपालिकेला किती तोटा येणार आहे याचा खुलासा करावा. माझ्या माहिती प्रमाणे केमिकल्स मधे जवळपास १८ ते १९ काटीचे नुकसान महानगरपालिकेस होणार आहे.

मा.आयुक्त : कंपनीकडून जकात मिळते ४० कोटी १९ कोटीचे नुकसान होत नाही.

श्री.बारवाल गजनन : कोणतीही कंपनी शहरा बाहेर जत नाही व जणारही नाही. बांधकाम साहित्यावर जे दर वाढविले त्यास आमची मान्यता नाही.

मा.सभापती : आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केला खाजगीकरणाचा प्रस्ताव हा सभागृहानेच मंजूर केला परंतू दरवाढीचा प्रस्ताव मंजूर केलेला नव्हता. हे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देतो. जकातीचे सुसुत्रीकरण करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव ठेवला सुरूवातीस सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा व त्या नंतर शासनाच्या मंजूरीसाठी ही कार्यवाही होणे अपेक्षीत होते. यात येणारी तूट व वाढ या बाबत सविस्तर माहिती प्रशासनाने दिलेली आहे. काहीवर वाढ व काहीवर दर कमी करण्याचे सुचविलेले आहे. बांधकाम साहित्यावर ३ टक्के ठेवलेले आहे. या प्रस्तावातून प्रशासनाने प्रशासनाची बाजू मांडलेली आहे. या प्रस्तावावर

सविस्तर अशी चर्चा झालेली असून ज्या दरवाढीस मान्यता देणार आहेत त्यानुसार प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर जईल. पेट्रोल डिझेल व घासलेट संदर्भात स.सदस्यांनी विरोध केलेला आहे. काही वस्तुवरील दरवाढ केली तर त्यांचा परीणाम होणार आहे हे जरी सत्य असले तरी नागरी सुविधा देण्यासंदर्भात कुठेतरी पैशाची तरतूद करावी लागेल. मधला मार्ग म्हणून तोडगा काढण्याची नितांत गरज आहे. समतोल असा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सर्व सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केलेले आहे. केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या दरात वाढ केली, गॅसच्या दरातही वाढ केली. इतर महानगरपालिकेचे दर विचारात घेवून निर्णय घ्यावा लागेल. कमीत कमी प्रमाणात वाढ करता येईल हा दृष्टीकोन समोर ठेवावा लागेल. यावर पुन्हा सविस्तर मत सदस्यांनी मांडावे अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते.

(सभा तहकूब दुपारी २.४५ वा. - सभेला सुरूवात ३.४० वाजता)

श्री.रेणूकादास वैद्य : औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी अनेक दर कमी केलेले आहे प्रशासनाचे अभिनंदन कौतुक करावे ते कमी आहे. यास आमची सर्वाची सम्मती आहे. परंतु अन्न धान्य यावर १ रूपया ऐवजी २ रूपये क्विटंलवर जकात आकारावी. किमतीवर आकारू नये. कारण एकाच प्रकारच्या धान्यामध्ये अनेक प्रकार असतात व त्याच्या किमती वेगवेगळया असतात. त्यामुळे नाका पावती फाडतांना वाद होवू शकतात. पेट्रोल, डिझेल, घासलेट दरवाढीस सर्वांचा विरोध आहे. केमीकल, सोलार फॅक्टरीज ज्या प्रमाणे त्याची वाढ व्हावी यासाठी प्रयत्न करतो इतर कंपनीचा विचार करून जे भंगार कचरा उचलला जतो त्यास ३०/-रूपये प्रति टन आकारावे अशी सुचना आहे.

श्री.विनायक पांडे : अन्न धान्य या मधे अनेक प्रकार असतात त्याच्या किमती कमी जस्त असतात यामूळे वाद होवू शकतात त्यावर १ /-रू. क्विटंल होते आता २ रूपये प्रति क्विंटल करावे. उर्वरीत जेस.सदस्य श्री. वैद्य यांनी सुचना केली त्याप्रमाणे दुरूस्ती करून हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.मुजीब खान : केमीकल वर कमी केले ते एवढे कमी करू नये जेकी महानगरपालिकेस वर्षाला लाखो रूपयांचे नुकसान होणार आहे. तसेच बकरी, मुर्गे, गाय, बैल, म्हैस या सर्वांवर जकात दर वाढवू नये. सर्व नागरीकांचा सुविधेचा प्रश्न आहे. मोठया मध्ये वाढवावे लहानाचे कमी असावे. सर्व लोक खातात भाव एकच आलेले आहे जी वस्तू मार्केट मध्ये वाढते आहे त्याला जस्त दर आकारावे. जसे की कुलर, फ्रीजया चैनीच्या वस्तू आहेत त्यावर कमी केले ते वाढवावे. जेवढया खाणेच्या वस्तू आहेत त्यावरील जकात दर आहे तेच ठेवावे.

मा.आयुक्त : अन्नधान्यावर किमतीवर ठेवावे वजनावर करू नये अशी विनंती आहे. तांदूळमधे बासमती येते त्याची किंमत ४० ते ५० रूपये किलोचे असते त्यावरही १ रूपया व जे७ ते ८ रूपये किलोचे असते त्यावरही एकच रूपया घेणार तर हे योग्य नाही. राईसवर एमआरपी किंमत असते १०००/- रूपये क्विंटल चे असेल तर ०.५ टक्के म्हणजे५ रूपये येतात. ७००/- रूपये क्विटंलचे घेतल्यास ३.५० रूपये होतात.

श्री.रेणूकादास वैद्य : नाक्यावर या बाबतीत वाद होतील.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | : प्रत्येक वस्तूवर टक्केवारीवर जकात आहे वाद होणार नाही. प्रत्येक वर्षाला दरवाढ करता येणार नाही. यात १५०० अॅटमचे दर दिलेले आहे. गेल्या २० वर्षात दर वाढ केलेली नाही, येत्या पाच वर्षात करता येणार नाही. तर किमंत ही दुप्पट होते. सर्व प्रोसेस पूर्ण करण्यासाठी दोन महिण्याचा कालावधी जणार आहे. प्रत्येक वेळी किंमत वाढली तर रूल बदलणार का? |
| श्री.रेणूकादास वैद्य | : वाद होवू नये यामुळे वजनावर घ्यावे. चार क्लॉलीटी कसे चेक करणार? |
| मा.आयुक्त | : गरीब आणि श्रीमंत यांचेकडून तेव्हढेच वसूली होते ते न होता किमतीवर ठेवले तर सर्वाना न्याय मिळेल. गव्हामध्ये तेव्हढी कॉलीटी नसते खादय म्हणून दर वाढवित नाही गहू घेणारे व राईस घेणारे एकच व्यक्ती आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : भंगारवर ६० रूपये टन ऐवजी ३० रूपये टन आकारण्यात यावे. |
| जकात अधिक्षक | : ३० रूपये प्रति टन भंगारवर आकारणी केली तर वर्षात ६ ते ७ लक्षचे नुकसान होईल. |
| मा.आयुक्त | : गाय, म्हैस, बैल याची किंमत करू शकत नाही. त्यासाठी ठरावीक रक्कम ठेवलेले आहे. कोंबडी, मुर्गा यावर ५ रूपये आहे. घासलेट वर आपण म्हणता आहात तेच ठेवावे ठिक आहे. त्याचा वापर हा गरीबच लोक करतात. परंतू डिझेल व पेट्रोलवर ठाणे महानगरपालिकमधे ४ टक्के आहे पिपंरी चिंचवड महानगरपालिकेत ३ टक्के आहे. यात एक टक्क्यावरून दोन टक्के केलेले आहे. |
| श्री.मुजेब खान | : पूर्वी व आताचे दरात मोठा फरक झालेला आहे. लिटर मागे ४५ पैसे वाढत आहे. |
| मा.आयुक्त | : एक कूटूंब १० लिटर वापर करीत असेल तर ४.५० रूपये बोज पडतो येथे कंपन्या आल्या तर मध्यम लोकांनाच नोकरी मिळेल. येथील औद्योगिकीकरण हे लहान स्वरूपाचे आहे. |
| श्री.मुजेब खान | : सर्वच वस्तूवर कर वाढविला तर २५ टक्के सरासरी येते. |
| मा.आयुक्त | : घासलेट वर वाढ करायची की नाही ते ठरवावे परंतू डिझेल व पेट्रोलवर जी दरवाढ सुचविलेली आहे त्यात कपात करू नये. |
| मा.सभापती | : या विषयावर सविस्तर अशी चर्चा झालेली आहे प्रशासनाने अभ्यासपूर्वक प्रस्ताव ठेवलेला आहे. त्याबद्दल प्रशासनास धन्यवाद देतो. प्रशासनास प्रशासन चालवायचे हे सत्य असले तरी स.सदस्य पदाधिकारी यांना महानगरपालिकेच्या उत्पन्ना बाबत व जनतेचा रोष या दोन्हींचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने निर्णय घेणे अपेक्षीत असते. तडजेडीच्या भुमिका स्वीकाराव्या लागतात. यात दूरूस्त्या सुचविण्याची आवश्यकता आहे. स.सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्याची नोंद घेवून जे प्रस्ताव देत आहोत तो जसाच्या तसा सर्वसाधारण सभेला द्यावा. यात अन्नधान्यामधे ६० ते ६५ लक्ष मिळते फार बदल होणार नाही. औद्योगिक मेटेरियल व औषधी यामध्ये जकात दर कमी केले, उत्पन्न कमी येत असेल परंतू चिकलठाणा औद्योगिक वसाहत टिकून राहावी. बेरोजगारांना रोजगार मिळावा. आजही जकातीत ४२ कोटी रूपये हे औद्योगिक वसाहतीतून महानगरपालिकेस मिळतात. जस्तीचे दर ठेवले तर कंपन्या शिफ्ट होवू शकतात. म्हणून जे दर प्रशासनाने कंपनीच्याच्या मटेरियलवर ठेवलेले आहे त्यास मान्यता देण्यात येते. ४० रू प्रति टन भंगार यावर दिले त्यास मान्यता देवून जशाच्या तसा प्रस्ताव स्विकारत आहे. तसेच अन्नधान्याच्या बाबतीत शेतकऱ्यांचा अनेक प्रकारचा माल |

असतो. ज्वारीत ४ प्रकार असतात खरेदीची पावती ते दाखवू शकणार नाही. खाजगीकरण झाले तर धान्यावर किमंतीवर जकात आकारते वेळी वाद होतील. म्हणून क्विटलंवरच ते आकारण्यात यावे. शेतकऱ्यांना अडचण येवू नये याची दखल घयावी. शेंगदाणा, साबुदाना, तांदूळ यावर क्विटल २ रूपये ऐवजे ४,६ काय जे वाढवायचे ते वाढविण्यात यावे. परंतु क्विटंलवरच आकारणी करावी. पेट्रोल, डिझेल, घासलेट यावर दरवाढ करण्यास मंजूरी देण्यात येत नाही. हा प्रस्ताव येणाऱ्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. या दरवाढीस मान्यता मिळेल, न मिळेल जकात खाजगीकरणाची कार्यवाही प्रशासनाने सुरू करावी. सदर दर मंजूर झाले तर त्याप्रमाणे कार्यवाही करावी नाही मंजूर झाले तर जे नियमाप्रमाणे उद्दीष्ट येईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी अटी शर्ती टाकून नमूद करावे व पुढील कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जकात दरात सुधारणा करत असतांना सोबत संलग्न करण्यात आलेल्या **जलींळि डलहशर्वीश्रश 'जेंठर्शींळीशर्वे** बाबत स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार (सोबतच्या तक्त्यातील अ.क्र.१, ३, ४, १३, १४, १५, २०, २१, ५१, ५२, ५३, ५४ व ६१ यात सुचविलेल्या बदलानुसार),कायदेशीर कार्यवाही पूर्ण करून जकात कराची वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत करणे करीता निविदा प्रसिध्द करणे व खाजगी अभिकर्त्या मार्फत जकात कराची वसुली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन जकात दराचे **ठर्शींळरिश्रळूरींळीं** करणेसंबंधी सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कचऱ्यापासून खत निर्माण करण्याचा कारखाना सत्यम बायोफर्टिलायझर सध्या बंद असून याबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

साचलेला कचरा कशा प्रकारे विल्हेवाट किंवा कमी करता येईल यासाठी मा.सभापती(वै.स.व आ.समिती) यांनी ज्या सूचना दिल्या त्यास प्रस्ताव स्वरूपात स्थायी समिती समोर मंजुरीसाठी ठेवण्यासंबंधी मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे. प्रस्तावातील मुद्दे पुढील प्रमाणे.

१. सध्या शेतकऱ्यांना शेतीसाठी खत म्हणून उपयोगात आणण्यासाठी प्रति ट्रक १००/- रूपये शुल्क आकारला जतो. त्यामुळे तो कचरा खत म्हणून कोणी घेवून जत नाही. यासाठी हे शुल्क रद्द करून विनाशुल्क कचरा शेतकऱ्यांना देण्यात यावा.
२. सिडकोकडून दररोज २५ ते ३० ट्रॅक्टर ट्रॉली कचरा नारेगांव कचरा डेपो येथे टाकला जतो हे काही योग्य नाही. तेथे कचरा टाकण्याचा सिडको प्रशासनाला अधिकार नाही. सिडको कडून येथे टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यावर सिडको प्रशासनास शुल्क आकरावा.

करीता स्थायी समितीच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड येथे साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे किंवा कचरा कमी करण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे मंजुरी देण्यात येते.

१. शेतकऱ्यांना शेतीसाठी खत म्हणून उपयोगात आणण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क रद्द करून विनाशुल्क कचरा शेतकऱ्यांना देण्यास मंजुरी देण्यात येते.
२. सिडकोकडून नारेगांव कचरा डेपो येथे टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यावर सिडको प्रशासनास शुल्क आकरण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९ :**

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, यांत्रिकी विभागात वाहन चालक कमी असल्यामुळे त्याच विभागातील हेल्पर, क्लिनर, मजूर (वर्ग-४) संवर्गातून ज्यांच्याकडे वाहन चालकांचा परवाना आहे अशा कर्मचाऱ्यांना वाहन चालकाचे काम देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकाम-१०३४/प्र.क्र.४०/सेवा-४, मंत्रालय, मुंबई दि.१६/८/२००४ नुसार जिल्हा व तहसिल या ठिकाणी असलेल्या कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना संध्याकाळी ७-३० ते ९-३० पर्यंत रू.१५/- दर तास व ९-३० नंतर रू.२०/- दर तास या दराने अतिकालीक भत्ता देण्यास शासनाची मंजुरी आहे.

वर्ग-४ संवर्गातील हेल्पर, क्लिनर व मजूर हे कर्मचारी ज्यांच्याकडे वाहन चालकाचा परवाना आहे, त्यांच्याकडून वाहन चालक म्हणून काम करून घेण्यात येते, अशा सोळा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या उपरोक्त दरानुसार अतिकालीक भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागात त्याच विभागातील हेल्पर, क्लिनर, मजूर (वर्ग-४) संवर्गातून ज्यांच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना आहे व ज्यांचेकडून वाहन चालकाचे काम करून घेण्यात येते अशा सोळा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार म्हणजेच संध्याकाळी ७-३० ते ९-३० पर्यंत रू.१५/- दर तास व ९-३० नंतर रू.२०/- दर तास या दराने अतिकालीक भत्ता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११० :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना भाडे तत्वावर महानगरपालिकेच्या जगा उपलब्ध करून देणे संदर्भाने स्थानिक वृत्तपत्रात जहिर सुचना देऊन अर्ज मागविण्यात आले होते. एकुण २८५ अपंग व्यक्तींनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर केले होते. दि.१७.१०.२००५ रोजी संत एकनाथ रंगमंदिर येथे महानगरपालिकेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेच्या २१ विविध ठिकाणच्या गाळयांची जहिर सोडत काढण्यात आली होती. त्यानुसार २१ व्यक्तींना त्यांनी सोडतीमध्ये दिलेल्या पसंतीप्रमाणे तत्वत: गाळयांची जगा निश्चित करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेतर्फे अपंग व्यक्तींना ५० चौरस फुट मोकळी जगा म्हणून देण्यात येणार आहे. ठएअञ्च ठएउछ्ञ नुसार शहरातील विविध ठिकाणच्या जगांचे भाडे मासिक भाडे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशिल | | सोडत विजेत्याचे नांव |
|---|---|---|---|
| १ | वॉर्ड 'अ' ऑफीस गाळा | - रू.२७९ प्रती | विजया काकडे |
| २ | वॉर्ड 'ब' ऑफीस गाळा | -रू.१७३ प्रती | कलावती सुर्यकांत छत्रबंद |
| ३ | वॉर्ड 'क' ऑफीस गाळा | - रू.१८६ प्रती | प्रकाश कडुबा उमके |
| ४ | वॉर्ड 'ड' ऑफीस गाळा | - रू.१६३ प्रती | संजय रघुनाथ दाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | वॉर्ड 'इ' ऑफीस गाळा | - रू.१४० प्रती | जलालुद्यीन खाजेद्यीन चव्हाण |
| ६ | वॉर्ड 'फ' ऑफीस गाळा | - रू.२७९ प्रती | कपिल विठ्ठल काथार |
| ७ | मनपा मुख्य कार्यालय गाळा | - रू.२७९ प्रती | १. संतोष कचरू खंडागळे<br>२.किशोर रंगनाथ सुरडकर |
| ८ | झाशी राणी उद्यान गाळा | - रू.४६५ प्रती | १. किरण रामलींग लोंढे<br>२. कचरू नारायण जातात |
| ९ | कोकणवाडी चौक गाळा | - रू.१६३ प्रती | माधुरी रामपल्लीवार |
| १० | नेहरू बालोद्यान गाळा | - रू.२३३ प्रती | १. सलीम खान अ.अजीज<br>२. शे. यास्मीन कौसर |
| ११ | नंदनवन कॉलनी उद्यान गाळा | - रू.१४० प्रती | १. रविंद्र बाळु गरूड<br>२. उमेश चत्रुराम कुसाळे |
| १२ | स्वामी विवेकानंद उद्यान गाळा | - रू.२१० प्रती | १. देवानंद भानुदास कलवले<br>२. मृणालीनी भगवान गोसावी |
| १३ | सिध्दार्थ गार्डन गाळा | - रू.२५६ प्रती | १. शेख उस्मान शेख यासीन<br>२. मंगल किसन अडागळे<br>३. पठाण महेमुद खान अब्बास<br>४. शकीलाबी सय्यद हुसैन |

करीता उपरोक्त प्रमाणे विविध ठिकाणच्या जगांचे प्रती गाळ्यांचे मासिक भाडे दर निश्‍चिती करीता प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : भाडे ठरवून दिले अनामत रक्कम घेतली भाडे तत्वावर दिल्यानंतर त्यांना पुन्हा टॅक्स हा कमर्शियल म्हणून लागेल तो लागू नये याची दक्षता घ्यावी.

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना भाडे तत्वावर महानगरपालिकेच्या जगा उपलब्ध करून देणे संदर्भाने महानगरपालिकेच्या विविध २१ ठिकाणच्या गाळ्यांसाठी प्रस्तावात नमूद केल्यानुसार अ.क्र.१ ते १३ च्या समोर दर्शविल्याप्रमाणे त्या-त्या जगांसाठी प्रती गाळ्याचे मासिक भाडे दर निश्‍चिती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर वर्ष २००५-०६ मध्ये जलशुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या तुरटी खरेदीच्या अंदाजपत्रक रक्कम रूपये १४.४२ लक्ष रक्कमेस मा.स्थायी समितीच्या दि.२४.८.२००५ रोजेच्या बैठकीत मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीनुसार वार्षिक तुरटी पुरवठा करण्याच्या कामाच्या निविदा मनपा/सूचना क्र.३०/०५ दि.१.९.२००५ अन्वये निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. निविदा

स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास विक्री झालेल्या आठ निविदांपैकी पाच निविदा धारकांनी निविदा दाखल केल्या असून, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नांव | दर | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.विमल ट्रेडींग कंपनी, जळगांव | रू.१७९०/- प्रति मे.टन | १२,५३,०००/- |
| २ | मे.विकास एंटरप्रायझेस, औरंगाबाद | रू.२४००/- प्रति मे.टन | १६,८०,०००/- |
| ३ | मे.सार्क ॲलम, औरंगाबाद | रू.२८००/- प्रति मे.टन | १९,६०,०००/- |
| ४ | मे.अलमायटी केमीकल्स, औरंगाबाद | रू.२०९९/- प्रति मे.टन | १४,६९,३००/- |
| ५ | मे. शिव केमिकल्स, शेवगांव | रू.२२९५/- प्रति मे.टन | १६,०६,५००/- |

वरील प्रमाणे प्राप्त निविदांचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.विमल ट्रेडींग कंपनी, जळगांव यांचा दर सर्वात कमी म्हणजेच रूपये १७९०/- प्रति मे.टन असा असून, सदरच्या दराने खरेदी करण्याची शिफारस मा.आयुक्त महोदय यांनी केली आहे.

उपरोक्त निविदे अंतर्गत वार्षिक तुरटीचे मे.विमल ट्रेडींग कंपनी यांच्या रूपये १७९०/- प्रति मे.टन या दराने खरेदी करावयाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर वर्ष २००५-०६ मध्ये जलशुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या तुरटी खरेदीकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच रू.१७९०/- प्रति मे.टन या दराची मे.विमल ट्रेडींग कंपनी, जळगांव यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ११२ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.६१ समर्थनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१६,३५,४५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात नवीन डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे. सदर कामास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

करीता र.रू.१६,३५,४५०/- च्या अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.६१ समर्थनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१६,३५,४५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>ऐनवेळचे विषय</u>**

**<u>विषय क्र. ११३ :</u>**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक दृष्ट्या जगतिक नकाशावर आहे. औरंगाबाद शहर हे ५२ दरवाजंचे शहर म्हणुनही प्रसिध्द असून आजमितीस जे काही ऐतिहासिक दरवाजे व त्यांचे अवशेष शिल्लक आहेत त्याचे जतन करणे आवश्यक आहे. सदर दरवाजंचे जतन करून दरवाजंच्या परिसराचे सुशोभिकरण करणेही आवश्यक आहे. इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट ॲन्ड कल्चरल हेरीटेज ही सेवाभावी संस्था असूनत्याचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. सदरील

संस्थेच्या औरंगाबाद शाखेने शहरातील ऐतिहासिक दरवाजे जतन करणे तसेच त्या सभोवतालचा परिसर सुशोभित करण्यासाठी महानगरपालिकेकडे प्रस्ताव दिलेला आहे.

सदरील संस्थेकडे भारतीय संस्कृती व भारतीय ऐतिहासिक वास्तु जतन करण्यासाठी संबंधीत विषयातील अखील भारतील स्तरावरील तज्ञ मंडळी उपलब्ध असल्याचे औरंगाबाद शाखेने कळविले आहे.

सदरहू ऐतिहासिक वास्तुचे जतन व इतर संलग्न कामे ही पुरातन वास्तु जतन या विषयातील तज्ञांच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनानुसार होणार आहे. कामा अंतर्गत वास्तुंचे संपुर्ण प्रमाणात नकाशे तयार करणे तसेच वास्तु जतनासाठी आवश्यक ती माहिती संग्रहीत करून सविस्तर अहवाल तयार करणे, कामांतर्गत असलेल्या बांधकाम साहित्यांची शिफारस करणे इत्यादी कामांचा समावेश असेल. वरील प्रमाणे सर्व कामे करण्यास औरंगाबाद शाखेने सल्लागार फिस म्हणून दहा टक्के (१०%) रक्कमेची मागणी केलेली आहे.

सदर प्रकरणी कामाचे ऐतिहासिक महत्व व औरंगाबाद शहराचे वारसा जतन होण्यासाठी संस्थेच्या स्थानिक पदाधिकारी यांच्या बरोबर चर्चा करण्यात आलेली असुन याबाबत वास्तु जतन करण्यासाठीच्या कामास चार टक्के (४%) फीस व सभोवतालील परिसर सुशोभित करणे यासाठी दीड टक्का (१.५%) सल्लागार फीस म्हणुन देण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव हा सदरची कामे ही भारतीय पुरातत्व खाते यांनी ठरवुन दिलेल्या निकषा प्रमाणे व त्यांच्या शिफारशीनुसार वास्तु जतन करण्यास तसेच सभोवतालचा परिसर हा विकसित करण्यासाठी सर्व नकाशे, अंदाजपत्रके, रंगसंगती बाबतीचे नकाशे तयार करणे तसेच कामावर देखरेख ठेवणे व कामाबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करणे इत्यादी बाबींच्या अटीवर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील ऐतिहासिक दरवाजंचे जतन करून दरवाजंच्या परिसराचे सुशोभिकरण करणेच्या कामासाठी ऐतिहासिक वास्तुचे जतन व इतर संलग्न कामे ही पुरातन वास्तु जतन या विषयातील तज्ञांच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनानुसार भारतीय पुरातत्व खाते यांनी ठरवुन दिलेल्या निकषा प्रमाणे व त्यांच्या शिफारशीनुसार वास्तु जतन करण्यास तसेच सभोवतालचा परिसर विकसित करण्यासाठी सर्व नकाशे, अंदाजपत्रके, रंगसंगती बाबतीचे नकाशे तयार करणे तसेच कामावर देखरेख ठेवणे व कामाबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करणे इत्यादी बार्बीसाठी इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अॅन्ड कल्चरल हेरीटेज या सेवाभावी संस्थेच्याऔरंगाबाद शाखेला वास्तु जतन करण्यासाठीच्या कामास चार टक्के (४%) फीस व सभोवतालील परिसर सुशोभित करणे यासाठी दीड टक्का (१.५%) सल्लागार फीस म्हणुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ११४ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.६४ क्रांतीचौक येथे उत्सव मंगल कार्यालय ते गजनन नगर, काल्डा कॉर्नर ते सिध्देश्वरचौक ते पन्नालालनगर येथे फुटपाथ बांधणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१४,९९,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात पुन:र्डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे. सदर कामास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

करीता र.रू.१४,९९,८००/- च्या अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.६४ क्रांतीचौक येथे उत्सव मंगल कार्यालय ते गजनन नगर, काल्डा कॉर्नर ते सिध्देश्वरचौक ते पन्नालालनगर येथे फुटपाथ बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.१४,९९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५ :**

मा. आयुक्त यांची मंजुरी व भाडे समितीच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची विविध व्यापारी संकुलातील रिक्त दुकाने बऱ्याच वेळा निविदा काढुन भाडेपट्ट्यावर गेले नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. त्याकरीता मा.आयुक्त यांनी भाडे समितीची बैठक घेवून संपूर्ण शहरातील मनपाच्या दुकान केंद्रांसाठी सर्वंकष अभ्यास करून दर ठरविलेले आहेत. त्यात पुर्वीचे नुसार शहरात सर्व ठिकाणी रू.४०००/- प्रति चौ.मी. असे अनामत रक्कमेचा दर होता तो रद्द करून आता जगेचे सार्वजनिक महत्व पाहुन दर ठरविले आहेत. ही दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने प्रचलीत अटी-शर्तीवर देण्यात येणार आहेत. करीता खालील दरास मान्यता देणे आवश्यक आहे.

१. **जफरगेट** :- एकूण ८ दुकाने, अनामत रक्कम रू.१५००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.१००/- प्रति चौ.मी. प्रति माह.
२. **औरंगपुरा भाजी मंडी पिया मार्केट, तळ व पहिला मजला** :- एकूण २१ दुकाने, अनामत रक्कम रू.३०००/- प्रति.चौ.मी. तळ मजल्यासाठी व रू.१५००/- प्रति चौ.मी. पहिल्या मजल्यासाठी व भाडे दर रू.१५५/- प्रति चौ.मी. प्रति माह तळमजला व पहिला मजला रू.१८९/- प्रति चौ.मी. प्रति माह.
३. **हर्षनगर** :- एकूण ३ दुकाने, अनामत रक्कम रू.१५००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.१५५/- प्रति चौ.मी. प्रति माह.
४. **संजयनगर** :- एकूण २ दुकाने, अनामत रक्कम रू.१७००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.७१/- प्रति चौ.मी. प्रति माह.
५. **कबाडीपुरा** :- एकूण १० दुकाने, अनामत रक्कम रू.१५००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.१५५/- प्रति चौ.मी. प्रति माह.
६. **सादिया मार्केट** :- एकूण १२ दुकाने, अनामत रक्कम रू.२०००/- प्रति चौ.मी. व भाडे दर अ-समोरील दुकानांसाठी रू.७५/-, इ-मागील दुकानांसाठी रू.६०/- व उ-गोडाऊनसाठी रू.४५/- प्रति चौ.मी. प्रति माह.
७. **साईनगर** :- एकूण २ दुकाने, अनामत रक्कम रू.२५००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.१००/- प्रति चौ.मी. प्रति माह.
८. **एकनाथनगर** :- एकूण २९ दुकाने, अनामत रक्कम रू.७५००/- प्रति दुकान व भाडे दर सारख्या क्षेत्राची दुकाने आहेत.(४.५६ चौ.मी.) म्हणून रू.३००/- प्रति दुकान प्रति माह भाडे.
९. **जय टॉवर पदमपुरा** :- एकूण २२ दुकाने, अनामत रक्कम रू.२०००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.१२५/- प्रति चौ.मी. प्रति माह.
१०. **सब्जीमंडी सिल्लेखाना** :- एकूण १ दुकान, अनामत रक्कम रू.४०००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.१५०/- प्रति चौ.मी. प्रति माह.
११. **चिकलठाणा (नवीन)** :- एकूण ५ दुकाने, अनामत रक्कम रू.२५००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.१२८/- प्रति चौ.मी. प्रति माह.
१२. **मालखरे क्लासीक, गारखेडा** :- एकूण ६ दुकाने, अनामत रक्कम रू.२५००/- प्रति चौ.मी. व भाडे दर रू.२०७/- प्रति चौ.मी. प्रति माह.

तरी भाडे समिती व मा.आयुक्त यांनी मान्यता/भाडे व अनामत रक्कम यास मंजुरी दिल्याप्रमाणे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वरील सर्व दुकान केंद्रांना वरील प्रमाणे दर आकारणे योग्य होईल. तसेच या दुकान केंद्राच्या भाडेकरू कडून (१) जगेचा मालमत्ता कर जे नियमाप्रमाणे येईल तो अर्जदारास भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल. (२) सेवा शुल्क रू.५/- प्रति चौ.मी. भरावे लागतील.

सदर दरानुसार मान्यता मिळाल्यास भाड्याचे दरावर जहीरात देऊन खुली बोली बोलवून दुकाने भाड्याने देण्यात येतील. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा हा प्रस्ताव आहे. याच सभागृहाने निर्देश दिल्यानुसार प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला आहे. यात महानगरपालिकेच्या मालकीची जी दुकाने, इमारती, व्यायाम शाळा व इतर हॉल असतील ते भाडे तत्वावर देण्याचा हा प्रस्ताव असून त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते व या संदर्भात मालमत्ता अधिकारी यांना सुचना करण्यात येते की यासंबधीची कार्यवाही एक महिन्यात करावी जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील अ.क्र.१ ते १२ मधील सर्व दुकान केंद्रांना त्यांच्या नांवापुढे दर्शविल्याप्रमाणे भाडे दर व अनामत आकारण्यास तसेच या दुकान केंद्राच्या भाडेकरू कडून १) जगेचा मालमत्ता कर जे नियमाप्रमाणे येईल तो अर्जदारास भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व २) सेवा शुल्क रू.५/- प्रति चौ.मी. भरावे लागतील या अटीस अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६ :**

उप आयुक्त (प्र) यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक २५.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेतील ठराव क्र.९५ नुसार आरोग्य विभागातील ठराविक वेतनावर कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सविस्तर माहितीसह सुधारीत प्रस्ताव ठेवण्याचा निर्णय झालेला होता. त्याप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांची सविस्तर माहिती सोबतच्या विवरण पत्रात देण्यात आलेली आहे. दि.२५.१०.२००५ च्या सभेतील विषय क्र.९५ नुसार ठेवण्यात आलेला प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील ठराविक वेतनावर कार्यरत असेल्या वैद्यकीय अधिकारी व वि. शास्त्रज्ञ (अर्धवेळ) यांना अनुक्रमे रू.५०००/- व रू.२५००/- ठराविक वेतन देण्यात येते.

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले ठराविक वेतनावरील वैद्यकीय अधिकारी हे मागील ६ वर्षापासून कार्यरत असून पूर्ण वेळ काम करीत आहेत.

करिता, त्यांना महानगरपालिकेतील ठराविक वेतनावरील पूर्णवेळ कार्यरत वैद्यकीय अधिकारी व अर्धवेळ कार्यरत वि.शास्त्रज्ञ यांना अनुक्रमे रू.८०००/- व रू.५०००/- प्रतिमाह ठराविक वेतन देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. तसेच अंदाजपत्रक मंजुरीसंबंधीच्या सर्व प्रस्तावांना मान्यता देवून स.सदस्यांकडून लेखाशिर्षक बदलण्यासंबंधी प्राप्त झालेल्या प्रस्तावांना सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून ठराविक वेतनावरील पूर्णवेळ कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना ५०००/- ऐवजी रू.८०००/- प्रतिमाह व अर्धवेळ कार्यरत वि.शास्त्रज्ञ यांना रू.२५००/- ऐवजी रू.५०००/- प्रतिमाह ठराविक वेतन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे., वि., इमाती व उद्याने) प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र.६४ मध्ये श्रेयनगर प्रभागातील मनपाच्या मंजुर रेखांकनातील खुल्या जगेत वीर सावरकर स्मृती सभागृहाची उभारणी करणेच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.१४,७०,०००/- चे तयार करण्यात आले असुन सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २००५-०६ मध्ये रक्कम रूपये २०.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.१६.११.२००५ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करीता र.रू.१४,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्याकरीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.६४ मध्ये श्रेयनगर प्रभागातील मनपाच्या मंजुर रेखांकनातील खुल्या जगेत वीर सावरकर स्मृती सभागृहाची उभारणी करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१४,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती** : **स.सदस्यांचे सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.** वार्ड क्र. ८, १३, २८, ४३, ४५, ४८ व ८९ चे स.सदस्य श्री.तरविंदरसिंग धिल्लन, सौ.मसर्रत बेगम युनुस पटेल, सौ.मेहरून्नीसा खान हमीद, श्री.निसार खान मोहम्मद खान, श्री.हाजे शेर खान हाजे अब्दुल रहेमान, प्रा.डॉ.दत्ता पाथ्रीकर व सौ.विजया रहाटकर या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रभागातील कामांसाठी लेखाशिर्ष बदलणे बाबत विनंती केल्यानुसार लेखाशिर्षामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वार्ड क्र. ८, १३, २८, ४३, ४५, ४८ व ८९ या प्रभागातील विविध कामासाठी लेखाशिर्ष बदलणे, आर्थिक तरतुद वळती करण्यास मान्यता देण्यात येते.

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| **८** | १२६/६ | स्लम भागात ड्रेनेज लाईन टाकणे-४.०० लक्ष | वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट, फिक्चर, विद्युत खांब बसविणे | **४.००** लक्ष |
| **१३** | १४६ | वॉर्ड क्र.१३ सुभेदारी गेस्ट हाऊस मागील वसाहतीत कॉंक्रेटींग करणे-२.०० लक्ष | वॉर्ड क्र.१३ मध्ये विविध ठिकाणी जीआय पोल, ७० वॅट व २५० वॅट सोडीयम फिटींग लावणे | **२.००** लक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२८** | १४६/१३ | नेहरूनगर डीपी रोड लगतच्या गल्लीत कॉंक्रेटींग करणे - १.०० लक्ष | सदफ कॉलनी कटकट गेट येथे कॉंक्रेटींग करणे | **१.००** लक्ष |
| **२८** | १८५/१७ | खाज कॉलनी ते एस.टी.कॉलनी पर्यंत गटार बांधणे - **५.००** लक्ष | वॉर्ड क्र.२८ मध्ये जी.आय.पोल बसविणे | **२.००** लक्ष |
| | | | वॉर्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे | **३.००** लक्ष |
| **४३** | १८६/६ | **१.** शरीफ कॉलनी येथील नाल्यातील चोकअप झालेली सिव्हर लाईनची दुरूस्ती करणे - **५.००** लक्ष | (अ.क्र.१+२ ची एकत्रित तरतुद **रू.८.०० लक्ष** मधून खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.) | |
| | **१५१/११ १** | **२.** रोशनगेट ते शरीफ कॉलनी दर्गापर्यंत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे-**३.००** लक्ष | १) अरफात मस्जेद कब्रस्तानची भिंतीची उंची वाढविणे व गेट बसविणे<br>२) वॉर्ड क्र.४३ मधील विविध ठिकाणी फरशी दुरूस्ती व कॉंक्रेटींग करणे<br>३) वार्ड क्र.४३ मध्ये टयुबलर पोल लावणे<br>४) वॉर्ड क्र.४३ मध्ये विविध ठिकाणी सोडीयम व्हेपर दिवे लावणे | **२.००** लक्ष<br>**१.००** लक्ष<br>**३.००** लक्ष<br>**२.००** लक्ष |
| **४५** | १२५/११-२ | नवीन डांबरीकरण-किराडपुरा प्रभाग क्र.४३,४४,४५ येथे डांबरीकरण करणे - **५.००** लक्ष | वॉर्ड क्र.४५ मध्ये हत्तेसिंगपुरा पाण्याच्या टाकीजवळील भागात खडीकरण व नुतनीकरण करणे | **५.००** लक्ष |
| **४८** | १४६/१२ | शुभश्री कॉलनी, साईनगर, अविष्कार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते बनविणे - १०.०० लक्ष | वॉर्ड क्र.४८ मधील खुल्या जगांचे कॉंक्रेटींग करणे | **१०.००** लक्ष |
| **८९** | १३५/३३ | ज्योतीनगर खुली जगा विकसित करणे व भिंत बांधणे - १.५० लक्ष | प्रभाग क्र.८९ येथे विविध ठिकाणी पथदिवे बसविणे | **१.५०** लक्ष |
| | १३५/३६ | प्रतापनगर येथे खुल्या जगेत उद्यान विकसित करणे - २.५० लक्ष | वॉर्ड क्र.८९ मधील उद्यानांची किरकोळ दुरूस्ती करणे | **२.५०** लक्ष |
| | १४९/५४ | प्रतापनगर येथील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे - ५.०० लक्ष | ज्योतीनगर येथील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे | **५.००** लक्ष |
| | १६७/११ १ | दशमेशनगर व प्रशांतनगर येथे जलवाहिनी टाकणे - ३.०० लक्ष | वॉर्ड क्रमांक ८९ मधील एस. बी. एच. कॉलनी येथे पुनर्डांबरीकरण करणे | **३.००** लक्ष |
| | १६९/१४ | दशमेशनगर शांताराम काळे यांच्या घराजवळ १५० मीमी व्यासाची जलवाहिनी दुरूस्ती करणे-२५ हजर | विठ्ठल मंदीर ज्योतीनगर येथे श्री सेट लावणे | **२५** हजर |

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद